# निर्देशन/ संचालन / दिग्दर्शन

**Thore Shivaji Dattatraya**

Ph. D, M. Phil.M.Com, M.A. (Eco), M.A.(Pol), M.A. (Mar), G.D.C & A, B.Ed (Gen), B.Ed (Phy), Arts, Science & Commerce College, Manmad, Dits. Nasik(M.S.), Research guide Pune, Univercity(Bus.Adm. & Business Practices)

## 1. प्रस्तावना (Introduction):

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यापार, व्यवसाय, उद्योजकता यांच्यात मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा, आधुनिक पद्धतीचा वापर होत आहे. वाहतूक, दळणवळण, संदेशवहन, विविध माध्यमाचा जाहिरातींसाठी वापर, पर्यायी उत्पादन, सर्वच क्षेत्रात संशोधन होत आहे. यामुळे उत्पादनाचे प्रमाण वाढले आहे. आयात, निर्यात मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत वाढली आहे. यातून रोजगार निर्मिती होत आहे. देशादेशाचे संबंध वाढत आहे. यातून नवीन माहिती प्राप्त होऊन सर्वांच्या ज्ञानात भर पडत आहे. सर्वत्र सलोख्याचे वातावरण निर्माण होऊन देशांत शांतता नांदत आहे. राष्ट्रीय उत्पन्नात भर पडत आहे. हे सर्व सुचक्रे निर्माण होण्यासाठी व्यवसायात योजना, नियोजन करून व्यवसायाचे हेतू, उद्देश सफल होण्यासाठी व्यवस्थापन महत्त्वाची भूमिका बजवत आहे.मार्शल डिमॉक च्या मते, निर्देशन / संचालन हे व्यवस्थापनाचे हृद्य आहे. त्यामध्ये वृत्ती ठरविणे, आदेश व सूचना देणे आणि गतिमान नेतृत्व देणे इत्यादींचा समावेश होतो.

स्पर्धेच्या युगात संघटनेची हेतू, उद्दिष्टे पूर्ण किंवा साध्य करण्यासाठी कर्मचाऱ्यांमध्ये एकतेची भावना निर्माण करण्यासाठी, त्यांच्यात संघटनेबद्दल प्रेम, आस्था, जिव्हाळा निर्माण करण्यासाठी व संघटना गतिमान करण्यासाठी निर्देशन महत्त्वाची भूमिका बजावित असते.

व्यापार, व्यवसाय, धंदा व उद्योजकता इत्यादी संघटनेत यंत्र, कच्चा माल या भौतिक साधनांबरोबर 'कर्मचारी' हा घटकही काम करत असतो. भौतिक घटकांवर लक्ष ठेवणे, नियंत्रण नियंत्रण ठेवणे सोपे आहे. याउलट मानवी घटक म्हणजे कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे अत्यंत अवघड बाब आहे. परंतु मात्र निर्देशनाद्वारे कर्मचाऱ्यांवर सुध्दा नियंत्रण ठेवले जाऊन त्यांना चांगले काम करण्यास कार्यप्रवृत्त केले जाते. व्यवसायाच्या व्यवस्थापनात निर्देशनाला मोलाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

व्यवसायिक व्यवस्थापनात नियोजन नियंत्रण, निर्देशन व अभिप्रेरणा ही अत्यंत महत्त्वाची कार्य आहेत. व्यवसायाची उद्दिष्टे साध्य किंवा सफल करण्यासाठी नियोजन केले जाते. नियोजनानंतर

कामे पूर्ण करण्यासाठी संघटन रचना केली जाते. संघटनेत योग्य व्यक्तीची निवड करून निर्णय घ्यावे लागतात. वरिष्ठापासून कनिष्ठापर्यंत मार्गदर्शन करावे लागते. म्हणून जे आदेश देऊन मार्गदर्शन व दिग्दर्शन केले जाते. त्यालाच निर्देशन असे म्हणतात. निर्देशनात कर्मचाऱ्यांना आदेश, सुचना, काम ठरवून देणे, कार्यपद्धती समजावून सांगणे. प्रत्यक्ष मार्गदर्शन करणे, कर्मचाऱ्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबींचा समावेश होतो निर्देशनामुळे व्यवसायाच्या कार्यात सुसूत्रता निर्माण होऊन दर्जेदार मालाचे उत्पादन होते. यामुळे नफाचे प्रमाण वाढते. व्यवसायाच्या नावलौकिकात भर पडते.

**2. उद्देश (Objective):**

1. निर्देशन अर्थचा अभ्यास करणे

2. निर्देशन व्याख्येचा अभ्यास करणे.

3. निर्देशन घटकांचा अभ्यास करणे

4. निर्देशनाच्या तत्वांचा अभ्यास करणे

5. निर्देशनाच्या तंत्रांचा अभ्यास करणे

6. निर्देशनाचे महत्त्वचा अभ्यास करणे.

**3. गृहीतके (Hypothesis)**

1. निर्देशन अर्थ अभ्यास करीत आहे.

2. निर्देशन व्याख्या अभ्यास करीत आहे.

3. निर्देशन घटकांचा अभ्यास करीत आहे

4. निर्देशनाच्या तत्वांचा अभ्यास करीत आहे

5. निर्देशनाच्या तंत्रांचा अभ्यास करीत आहे

6. निर्देशनाच्या महत्त्वचा अभ्यास करीत आहे.

**4. निर्देशन अर्थ**

**[Meaning of Direction]**

कोणत्याही व्यवसायातील व्यवस्थापनात नियोजन, नियंत्रण, निर्देशन व अभिप्रेरणा ही अत्यंत महत्त्वाची कार्य असून ती व्यवसायाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रथम नियोजन करतात त्यामुळे व्यवसायाची उद्दिष्टे पूर्ण होऊन व्यवसाय यशस्वी होतो. यात निर्देशनाची भूमिका फार महत्त्वाची असते. संघटनेतील कार्य चांगल्या रीतीने पूर्ण व्हावीत म्हणून व्यवस्थापकीय प्रयत्नांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करून प्रेरणा दिली जाते. त्याला निर्देशन असे म्हणतात. असे मत एस.एस. चॅटर्जी यांचे आहे. कुन्टझ वा ओडोन च्या मते, संचालन हे क्लिष्ट काम असून त्यामध्ये दुय्यम अधिकाऱ्यांना दीर्घ व अल्प मुदतीत परिणामकारक आणि कार्यक्षमपणे काम करण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या सर्व कार्याचा समावेश होतो. निर्देशनामुळे व्यवसायाच्या कार्यात सुसूत्रता येऊन वेळेवर सर्व ध्येय साध्य होण्यास सहकार्य होते. भविष्याची वाटचाल योग्य करता येते.

**5.निर्देशन व्याख्या**

**[Meaning Of Definition]**

1. जॉर्ज टेरी च्या मते:-

“निर्देशन म्हणजे प्रत्यक्ष कृती सुरू करणे व कर्मचारी वर्गात अभिप्रेरणा व शक्ति (उत्साह) निर्माण करणे होय.”

2. उर्वीक व ब्रेच च्या मते:-

“व्यवस्थापनातील जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या स्त्री व पुरूष कामगारांना मार्गदर्शन करणे, प्रेरणा देणे व त्यांचे नेतृत्व करणे म्हणजे निर्देशन किंवा संचालक होय.”

## 6.निर्देशनाचे घटक

## [Elements Of Direction]




कोणत्याही व्यवसायात व्यवस्थापकाला विविध प्रकारची कार्य करावी लागतात. कार्याचा क्रम निश्चित करावा लागतो व्यवस्थापकाला नियोजन, नियंत्रण, समन्वय कर्मचाऱ्यांची नेमणूक, संघटन या कार्यानंतर संचलनाच्या कार्याचा क्रम ठरवावा लागतो. त्यानंतर नियंत्रणाचे कार्य करावे लागते. व्यवस्थापक जोपर्यंत संचालकाचे कार्य करित नाही. तो पर्यंत त्याला प्रभावी नियंत्रण ठेवता येत नाही. संचलनाच्या अर्थावरच नियंत्रण कार्याचा प्रभावीपणा अवलंबून असतो यात शंकाच नाही.

व्यवस्थापकाला त्यांच्या हाताखाली कामगारांना नेहमी कामासाठी आदेश द्यावे लागतात. संघटनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांना त्यांची कामे समजून सांगावी लागतात. व्यवस्थापनात तीन स्तर असतात. उच्च, मध्यम व कनिष्ठ. उच्च पातळीवरील अधिकारी हे दुय्यम अधिकाऱ्यांना आदेश देत असतात आणि कनिष्ठ पातळीवरील कर्मचाऱ्यांना आदेश देऊन कर्मचाऱ्यांकडून प्रत्यक्षात काम करून घेतले जाते. निर्देशनाचे आदेश सर्वच पातळ्यांवरून होत असते. व्यवसायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिकार प्रदानाची आवश्यकता असते. प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याच्या जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडता यावे. म्हणून त्याला अधिकार द्यावे लागतात. हे अधिकार कर्मचाऱ्यांची योग्यता व पात्रता पाहून दिले जातात.

कोणत्याही व्यवसायात दुतर्फा संदेशवहनाची आवश्यकता असते. व्यवसायात व्यवस्थापकाला अनेक घटकांमध्ये प्रभावीपणे समन्वय साधावा लागतो. कर्मचारी, यंत्रे, कच्चा माल, पक्का माल, उत्पादनाच्या प्रक्रिया, हिशेब ठेवणे इत्यादी अनेक प्रकारच्या कार्यात व्यवस्थापकाला समन्वय साधावा लागतो. त्यामुळे कार्यात समन्वय प्रस्थापित करणे हे व्यवस्थापनाचे महत्वाचे कार्य किंवा भूमिका समजली जाते. यामुळे व्यवसायाची उद्दिष्टे सफल होऊन स्पर्धेच्या युगात व्यवसाय यशस्वी होतो. ग्राहकांची सेवा करता येते. माफक किंमतीत दर्जेदार वस्तूची सेवा उपलब्ध करून देऊन व्यवसायाचे नावलौकिक टिकवून ठेवता येते.

**7.निर्देशनाची तत्वे**

**[Principle Of Direction]**

दोन प्रकारची तत्वे आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ) निर्देशनाचा हेतु किंवा उद्दिष्टांशी निगडीत तत्वे | ब)निर्देशन प्रक्रियेशी निगडित तत्वे |
|---|---|
| १.कर्मचाऱ्यांच्या व्यक्तीगत सहभागाची तत्वे. | १.आदेशातील एक वाक्यता |
| २.उद्दिष्टातील सुसंवादाचे तत्वे | २.प्रत्यक्ष निरिक्षण तत्व |
| ३.निर्देशन तत्वे. | ३.निर्देशन कार्यातील सुस्पष्टता |
| | ४.सुयोग्य वेळ व कार्यापध्दती |
| | ५.सुयोग्य व्यवस्थापन पातळी |
| | ६.योग्य निर्देशन तत्व |
| | ७.संदेशवहनाचे तत्वे |
| | ८.अनौपचारीक संघटनेच्या उपयोगाचे तत्वे |
| | ९.नेतृत्वाचे तत्वे |
| | १०.सिंहावलोकन व पाठपुरवठा |

**8. निर्देशनाची तंत्रे**

**[Technique of Direction]**




निर्देशनाची तीन तंत्रे दिसून येतात. एकतंत्री/हुकूमशाही तंत्रात व्यवसायाचा प्रमुख अधिकारी सर्व निर्णय स्वतःच घेतो व कनिष्ठांना आदेश देतो. कर्मचाऱ्यांनी कोणते काम केव्हा कसे व कोठे करावे या बाबींचा स्पष्ट सूचना त्यांना देण्यात येतात. या तंत्रात सर्व अधिकार वरिष्ठ व्यक्तींकडे असतात. म्हणूनच त्याला एकतंत्री/ हुकूमशाही तंत्र असे म्हणतात.

मुक्त संचालन तंत्रात कर्मचाऱ्यांना स्वातंत्र्य देण्यात येते. संस्थेचे वरिष्ठ अधिकारी संस्थेची नीती,धोरण व कार्यक्रम इत्यादींची आखणी करतात. धोरणाच्या व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत कर्मचाऱ्यांना पुढाकार घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले जाते. त्यामुळे ते आपल्या ज्ञानाचा अनुभवाचा आणि बुद्धीचा पुर्ण वापर करत असतात. जे कर्मचारी सुशिक्षित, बुद्धिमान, हुशार असून जबाबदारी स्वीकारण्यास तयार असतात. अशा कर्मचाऱ्यांना मुक्त संचालन तंत्रात त्यांचे कौशल्य वाढवण्याची संधी प्राप्त होते. त्यातून त्यांना वरिष्ठ अधिकारी म्हणून भरती मिळण्याची संधी मिळते यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये व्यवस्थापन योग्यता यावी व त्यांची चिंतनशक्ती वाढून ते निर्णयक्षम व्हावेत असे वातावरण निर्माण केले जातात हे एक विशेष या तंत्रात दिसून येते.

जागतिक वातावरणात कितीही नवीन बदल झाले तरी एकतंत्री निर्देशन व मुक्त संचालन या निदर्शनाच्या दोन तंत्राचा सुवर्णमध्य गाठण्याचा प्रयत्न सल्लामसलतीचे तंत्र होय. सल्लामसलतीच्या तंत्रात औपचारिक परिषद व अनौपचारिक परिषद या माध्यमाने निर्णय घेतले

जातात. औपचारिक परिषद या माध्यमाने निर्णय घेतले जातात. औपचारीक परिषदेमध्ये संस्थेचा विस्तार,संकोच, नविन योजना, संघटन रचनेतील बदल व नवीन कार्यपद्धती इत्यादींवर औपचारिक परिषदेत विचार विनिमय होतो.अनौपचारीक परिषदेमध्ये कर्मचाऱ्यांच्या अडचणी दूर करून त्यांच्या कामात समन्वय घालण्याचा त्यांच्यातील मतभेद दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. यावरून असे निदर्शनास येते की विचार विनिमयाला सल्लामसलती तंत्रात महत्त्वाचे स्थान आहे. यात शंका नाही.

### 9. निर्देशनाचे महत्व

जगात आज सर्वत्र स्पर्धेचे वातावरण असून सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्पर्धा दिसून येत आहे. यात यशस्वी होण्यासाठी चांगले व्यवस्थापन, मार्गदर्शन, नियोजन, संदेशवहन, निर्देशन असणे गरजेचे आहे. म्हणून कोणतीही व्यवसाय संघटना यशस्वी होण्यासाठी व्यवसायातील बदलाचा परिणाम सहन करण्याची ताकद त्यांच्यामध्ये असावी लागते. आंतरिक व बाह्य परिस्थितीतील बदलांमुळे जुन्या योजनांच्या ठिकाणी नवीन योजना सुरू केल्या जातात. नियंत्रण, समन्वय व निरीक्षणाच्या पद्धतीतही बदल होतो.इ. सर्व बदलांच्या अनुकुलतेमध्ये रुपांतर किंवा बदल करण्यासाठी व्यवस्थापनाला कर्मचाऱ्यांना प्रेरणा देऊन मार्गदर्शन करावे लागते. हे सर्व काम निर्देशनाद्वारेच प्रभावीपणे करावे लागते. हे एक विशेष आहे.

व्यवसायात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या अंगी एक विशेष गुण असतो. प्रत्येकाची कार्यक्षमता वेगळी असते. या गुणाचा वापर करण्याची क्रिया निर्देशनामुळे शक्य होऊन त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होते. संघटनेचे स्थैर्य व विकास तिच्या मालकावर अवलंबून असतो. संघटना दीर्घकाळ अस्तित्वात राहावी, तिची सतत प्रगती व्हावी म्हणून तिला योग्य नेतृत्व मिळणे आवश्यक आहे. थोडक्यात योग्य नेतृत्व संदेशवहन व प्रेरणा इत्यादी बाबी संघटनेला स्थैर्य निर्माण करून देतात यावरून असे सिद्ध होते की, व्यवसायात उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन, संघटन, पूर्वानुमान, नियुक्ती इत्यादींची आवश्यकता असते. पूर्वनिर्धारित उद्दिष्टांप्रमाणे कार्य होण्यासाठी समन्वय व नियंत्रणाची गरज असते. परंतु व्यवस्थापनातील विविध कार्य व घटकांना कार्यप्रवृत्त करण्याची कार्य निर्देशन करते म्हणून व्यवस्थापनात निर्देशनाचे महत्त्व अत्यंत मोलाचे आहे.

### 10.समारोप [Conclusion]:-

कोणत्याही व्यवसायातील व्यवस्थापनात कर्मचाऱ्यांना विविध प्रकारची कार्य करावे लागतात. परंतु ती कमी गुंतागुंतीची आणि किचकट स्वरूपाची असतात ही कामे योग्य रीतीने होण्यासाठी कर्मचाऱ्यांना वरिष्ठांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा असते .तसेच त्यांना वित्तीय व अवित्तीय स्वरूपाच्या

प्रेरणा दिल्यास त्यांच्या कार्यक्षमतेत चांगलीच वाढ होताना दिसते. निर्देशनाद्वारे कर्मचाऱ्यांना मार्गदर्शनही केले जाते व प्रेरणा दिल्या जातात. म्हणुनच व्यवस्थापनात निर्देशनाचे महत्व आहे. यावरुन असे सिद्ध होते की, निर्देशनामुळे व्यवसायाच्या कार्यात सुसूत्रता निर्माण होऊन व्यवसाय यशस्वी होण्यास मदत होते.

**11. संदर्भसूची [Bibliography]**

1. व्यवसाय व्यवस्थापन- I

डॉ. पराग काळकर , डॉ. अजिनाथ मारुती डोके

निराली प्रकाशन पुणे 411005

2. Management: theory and practice

J.M.chandan

3. Business organisation and management

Dr.Y.K.bhushan

4. Principle of management

Reddy Tata

5. Principle and practices of management

L.M.Prasad,S.C.chand

6. व्यवस्थापन

प्रा. सुरेश भिरुड, प्रा. भास्कर नाफडे

निराली प्रकाशन पुणे

7. व्यवसाय व्यवस्थापन

प्रा. संतोजी शेळके

डॉ. अजिनाथ डोके